जळगाव दि.१८ ( प्रतिनिधी) : पीएम उषा अंतर्गत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भारतीय मानव्य प्राच्यविद्या अध्ययन केंद्र ,कला व मानव विद्या प्रशाळेच्यावतीने "क्रीडा सृष्टीमध्ये भारतीय सृष्टी " एकदिवसीय राज्यस्तरीय परिषदेचे उद्घाटन अखिल भारतीय महामंत्री क्रीडा भारती पुणे येथील केशव (राज) चौधरी यांच्या हस्ते आज दिनांक १८ मार्च २०२६ रोजी सकाळी १०.१५ वाजता करण्यात आले. यावेळी कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी अध्यक्षस्थानी होते.

यावेळी मंचावर प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, व्य.प.सदस्य राजेंद्र नन्नवरे, जळगाव जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक, क्रीडा प्रशासक संभाजीनगर पंकज भारसाखळे, संचालक प्रा. राम भावसार हे उपस्थित होते. या कार्यशाळेत नॉलेज पार्टनर क्रीडा भारती जळगाव हे आहेत.

भारतात अनेक खेळांचा जन्म झाला असून, भारतीय शिक्षणांमध्ये विविध खेळांची दृष्टी दिसते, भारतात प्राचीन काळांपासून छोट्या छोट्या खेळातून शैक्षणिक मूल्य जोपासले जात आहेत. आपल्या हातात येईल त्या साधनाने खेळणे ही भारतीय संस्कृती आहे (उदा. लेझीम, तलवार बाजी, मल्लखांब, कबड्डी, विट्टी दांडु, मातीतील कुस्ती इ.) खेळांमधून बुध्दी आणि शक्तीचा विकास होतोच तर त्यातून आपण शैक्षणिक प्रगतीही साधू शकतो. नवीन शैक्षणिक धोरणा अंतर्गत शारीरिक शिक्षण व खेळ ,संतुलित आहार, क्रीडा, शासनाच्या योजना तसेच खेळातून रोजगाराच्या संधी याची माहिती केशव (राज) चौधरी यांनी त्यांच्या बीज भाषणात दिली .

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी सांगितले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये अभ्यासक्रमासोबतच सहअभ्यासक्रम आणि अभ्यासक्रमेत्तर उपक्रमाला महत्व दिले गेले आहे. त्यामध्ये खेळासोबत शिक्षण घेणाऱ्याला क्रेडीट गुण दिले जातात. विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाला जर विकसित करावयाचे असेल तर क्रीडा क्षेत्रात नैपुण्यता महत्वाची आहे. भारतीय ज्ञान परंपरेचे महत्व भारतीय खेळातील क्रीडा प्रकारात जाणवते. यामध्ये कौशल्य, सहनशक्ती व ताकद या तीन गोष्टी महत्वाच्या आहेत. आजच्या आधुनिक युगात क्रीडा प्रकारांमध्ये नवतंत्रज्ञानाचा उपयोग आणि मानसिक आरोग्य याला महत्व प्राप्त झाले आहे. आपले विद्यापीठ क्रीडा विकासासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना राबवित आहे असे त्यांनी सांगितले.

सुरुवातीस क्रीडा प्रशासक पंकज भारसाखळे यांनी सांगितले, 'क्रीडा से निर्माण चरीत्र का, चरीत्र से निर्माण राष्ट्र का' यानुसार क्रीडा धोरणांची वाटचाल सुरु आहे. क्रीडा सारख्या विषयावर होत असलेल्या या एक दिवसीय राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन या विद्यापीठात होत आहे ही आनंदाची बाब आहे. आपल्या प्रास्ताविकात व्य.प. सदस्य राजेंद्र नन्नवरे यांनी भारतात खेळाचे महत्व फक्त मनोरंजन म्हणून नाही तर ती आपली जीवनशैली आहे. भारतीयांचा खेळांकडे बघण्याचा दृष्टीकोन रचनात्मक राहीला आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात शिक्षणाबरोबर खेळाला महत्व प्राप्त झाले आहे. उद्घाटन सत्राचे आभार प्रा. शरद पाटील यांनी तर सूत्रसंचालन दिपाली माळी आणि खेमराज पाटील यांनी केले.

उद्घाटनसत्रानंतर 'क्रीडाविकासासाठी केंद्र व राज्य शासनाच्या योजना व खेळातून रोजगाराच्या संधी' या विषयावर जळगाव जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक यांचे व्याख्यान झाले. संभाजीनगर येथील डॉ. दयानंद कांबळे यांचे 'भारतीय पारंपरिक आहार व आधुनिक पोषणशास्त्र' तसेच अमृत बिऱ्हाडे यांचे 'क्रीडा धोरणे व भारतीय क्रीडा सृष्टीचा विकास' यावर व्याख्याने झाली. या एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेसाठी एकूण १२० क्रीडा शिक्षक सहभागी झाले होते. यावेळी क्रीडा भारतीचे जिल्हा मंत्री प्रशांत जगताप, अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, क्रीडा संचालक डॉ. दिनेश पाटील डॉ. संजय चौधरी, जळगाव जिल्हा क्रीडा अधिकारी डॉ. सुरेश थरकुडे हे उपस्थित होते.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: १८ मार्च, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता

जळगाव दि.१८ ( प्रतिनिधी) :कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठचा विद्यार्थी देवा सपकाळे याने सत्यभामा विद्यापीठ, चेन्नई येथे आयोजित ३९ व्या आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सव मध्ये फाईन आर्ट (क्ले मॉडेलिंग) प्रकारात रौप्य पदक पटकावले आहे. त्यांच्या या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी कौतुक करत शुभेच्छा दिल्या आहेत.

हा युवा महोत्सव सत्यभामा विद्यापीठ, चेन्नई येथे पार पडला. देशभरातील विविध विद्यापीठांमधून सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये अत्यंत स्पर्धात्मक वातावरणात देवा सपकाळे याने आपल्या सृजनशीलतेचा आणि कलात्मकतेचा ठसा उमटवला. सातत्यपूर्ण सराव आणि मेहनतीच्या जोरावर त्याने उत्कृष्ट कामगिरी करत रौप्य पदक मिळवले.

या यशाबद्दल कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, सदस्य नितीन झाल्टे तसेच विद्यार्थी विकास संचालक डॉ. चंद्रशेखर वाणी यांनीही देवा सपकाळे याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. संघ व्यवस्थापक म्हणून प्रा. डॉ. संजय शिंगाणे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

**बातमी नं. २**

जळगाव दि.१८ ( प्रतिनिधी) :कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात प्राध्यापक प्रबोधिनी कार्यक्रमांतर्गत विद्यापीठाच्या योगा विभागातील लिन्टा चौधरी यांचे 'हठयोग' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमप्रसंगी प्रशाळेचे संचालक डॉ. म. सु. पगारे यांनी अध्यक्षस्थान भूषविले.

यावेळी लिन्टा चौधरी म्हणाल्या की, आसन, प्राणायाम, मुद्रा अशा विविध माध्यमातून शरीरातील पंचेंद्रिये आणि ज्ञानेंद्रियांची शुद्धी होण्यासाठी हठयोग केला जातो. यासोबतच शरीराची शुद्धी करण्यासाठी षटकर्म देखील हठयोगात येतात. सध्याच्या आधुनिक जीवनशैलीमुळे देखील अनेक आजार त्यामुळे योग केल्याने आपण निरोगी आयुष जगू शकतो असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्रा. म. सु. पगारे म्हणाले की, नियमित केलेला योग शरीराला लवचिकता प्राप्त होण्यासाठी महत्त्वाचा आहे. तसेच मनाच्या एकाग्रतेसाठी योग आवश्यक आहे. त्यामुळे स्वतःच्या शरीराच्या निरोगीपणाकडे लक्ष दिल्याने मन आणि शरीर निरोगी असेल तरच कामाच्या ठिकाणी कर्तव्य करत असताना कोणतेही कार्य व्यवस्थितपणे करता येते असे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रम प्रसंगी प्रशाळेतील प्राध्यापकांनी 'हठयोग' या विषयावर चर्चेत सहभाग घेतला. याप्रसंगी प्रशाळेतील मराठी विषयाचे प्राध्यापक डॉ. दीपक खरात, डॉ. भारती सोनवणे, इंग्रजी विषयाचे प्राध्यापक डॉ. सुदर्शन भवरे, कृष्णा संदानशिव, प्रतिभा गलवाडे, हिंदी विषयाच्या प्राध्यापिका डॉ. प्रीती सोनी, संशोधक विद्यार्थी खेमराज पाटील, महेश सूर्यवंशी यांसह नेहा लाम्हणे, प्रीती मनुचारी, पल्लवी बारी, सुकन्या जाधव तसेच शिक्षकेतर कर्मचारी चंद्रकांत बिऱ्हाडे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार इंग्रजी विभागातील सहाय्यक प्राध्यापिका प्रतिभा गलवाडे यांनी केले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ — दिनांक: १८ मार्च, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता